# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

वृत्तवेध
पुण्य नगरी
पुणे ■ रविवार, २३ मार्च २०१४


# राजगुरू स्मारक परिसराची स्वच्छता

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

हुतात्मा राजगुरू यांच्या शहीददिनाच्या पार्श्वभूमीवर राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी राजगुरूवाडा (स्मारक) व परिसराची स्वच्छता केली.

थोर क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या बलिदान दिनानिमित्ताने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले होते. यामध्ये महाविद्यालयातील १०० पेक्षा जास्त स्वयंसेवक सहभागी झाले होते. या वेळी हुतात्मा भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाची माहिती देण्यात आली. हुतात्मा राजगुरू यांच्या कार्याची प्रेरणा घेण्याची या स्वयंसेवकांनी येथे प्रतिज्ञा केली. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. सुनील पानसरे यांनी केले.



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी हुतात्मा राजगुरू स्मारक आणि परिसराची स्वच्छता केली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख